## नियमित दिवाणी मुकदमा क्र.३७४/२०१६ मधील नि.क्र.६३ वरील आदेश

०१. प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी त्यांचे विरुध्द दिनांक ०९.१२.२०२४ रोजी पारीत करणेत आलेला अतिरीक्त लेखी कैफियत नाहीचा आदेश रद्दबातल होऊन मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. ४ याने अर्जाच्या पुष्ठयर्थ त्याचे प्रतिज्ञापत्र नि.क्र.६४ प्रमाणे दाखल केले आहे.

०२. वादींनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्या विरुध्द दावा मिळकतीत ०–०४ आर क्षेत्रात केलेले अतिक्रमण स्वखर्चाने काढून घ्यावे, अशी प्रतिवादी यांना कृतित्मक ताकीदीसाठी व मो. र. नं. ५४८ मध्ये प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी अतिक्रमण केल्याचे जे दर्शविले गेलेले आहे त्या क्षेत्राचा बांधकामासहीत कब्जा मिळणेकरीता व निरंतर ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. १ ते ४ असे कथन करतात की, वादींनी प्रस्तुत दाव्याकामी दुरुस्ती करुन दावा परीच्छेद क्र. ६अ व विनंती परीच्छेद क्र. १३अ–१ मध्ये जादा मजकुर नमूद करून प्रतिवादीकडून तथाकथित अतिक्रमीत क्षेत्राची मागणी केली आहे. वादींनी दावा दुरुस्त केल्यानंतर प्रतिवादी क्र. १ ते ४ यांना मुदतीमध्ये जादा कैफियत दाखल करणे गरजेचे व आवश्यक होते, परंतु, सदर दाव्यातील प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी शेती व्यवसायातून वेळ मिळू न शकल्याने दाव्यातील प्रतिवादी क्र. १ ते ४ यांना जादा कैफियत दाव्याकामी दाखल करता आली नाही. प्रस्तुतचा दावा हा अतिक्रमीत क्षेत्राची मागणीचा व निरंतर ताकीदीचा असल्याने दाव्याकामी वादीने दुरुस्ती केल्यानंतर प्रतिवादी क्र. १ ते ४ यांना जादा कैफियत देणे गरजेचे व आवश्यक आहे. जर प्रतिवादी क्र. १ ते ४ यांची जादा कैफियत दाखल करुन घेतली नाही तर त्यांचे न्यायहक्क डावलले जाऊन पैशाने अगर अन्य कशानेही न भरुन येणारे असे फार मोठे नुकसान होणार आहे. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांना जादा कैफियत दाखल करण्यास झालेल्या उशिराचे कारण खरे व प्रामाणिकपणाचे आहे. करीता, प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्या विरुध्द जादा कैफियत नाहीचा झालेला आदेश रद्द करण्यात येऊन जादा कैफियत देणेस परवानगी मळावी, अशी प्रतिवादींनी विनंती केली आहे.

०३. वादी यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन आक्षेप नोंदवला आहे. वादी असे कथन करतात की, अर्जात नमूद केलेले कारण कायदेशीर नाही. प्रतिवादी क्र. १

ते ४ यांना जादा कैफियत देणेस किती दिवसांचा उशिर झालेला आहे, त्याचा उल्लेख केलेला नाही.  करीता, प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करणेची वादींनी विनंती केली आहे.  यदा कदाचित प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणेचे झालेस वादींना र. रु. ५,०००/– खर्च देणेत यावा, अशी वादींनी विनंती केली आहे.

०४.  प्रस्तुत अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावर दाखल असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रस्तुत प्रकरणाचे अभिलेखाचे बारकाईने अवलोकन केले असता ही बाब स्पष्ट होते की, प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे विरुध्द दिनांक ०९.१२.२०२४ रोजी जादा कैफियत नाहीचा आदेश पारीत करणेत आलेला आहे.  प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना त्यांची जादा लेखी कैफियत दाखल करण्यास विलंब झाला आहे.  प्रस्तुत अर्ज मंजूर केल्यास, माझ्या मते, प्रतिवादी क्र. १ ते ४ यांना त्यांची जादा लेखी कैफियत अभिलेखात दाखल करणे शक्य ठरेल.  प्रस्तुत अर्ज मंजूर केल्यास वादींचे अपरिमीत असे नुकसान होईल अशी सुतराम शक्यता दिसून येत नाही. सदय स्थितीत प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचे विरुध्द पारीत करणेत आलेला जादा कैफियत नाहीचा आदेश रद्द करणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारित करतो.

## <u>आदेश</u>

१. अर्ज खर्च रू.३००/- (रु. तिनशे फक्त) सह मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी उपरोक्त नमूद खर्चाची रक्कम वादींना दिल्यानंतर त्यांनी दाखल केलेली जादा कैफियत/म्हणणे अभिलेखावर घेण्यात यावे.

SALIM PIRMAHAMAD SAYYAD

Digitally signed by SALIM PIRMAHAMAD SAYYAD
Date: 2025.11.13 12:20:12 +0530

दि.१२.११.२०२५

(एस. पी. सैय्यद)

२रे सह–दिवाणी न्यायाधीश व. स्तर.वडूज.